मूल्यवर्धन

# प्रेरणा

महाराष्ट्र संवादपत्र ३ : जुलै ते सप्टेंबर २०१९



## मूल्यवर्धन विषयी उपसंचालक यांचे मनोगत



शिक्षणातून मुलांच्या अंगभूत क्षमता वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातात. मूल्यशिक्षणातून क्षमतांना व्यक्तिगत आणि सामाजिक दृष्टिकोनातून इष्ट वळण दिले जाते. मूल्यांची जोड नसेल तर क्षमताविकास दिशाहीन होईल. अनेक वर्षांपासून अभ्यासक्रम, अध्ययन–अध्यापन यांमधून मूल्यशिक्षण देण्याचा प्रयत्न सुरु आहे. मूल्यवर्धन हा देखील मूल्यशिक्षणाचाच कार्यक्रम आहे, तथापि त्यातली कार्यपद्धती अधिक परिणामकारक आहे. याची काही कारणे आहेत. पहिले कारण म्हणजे सहयोगी विचारमंथनाला चालना. चांगले वागण्यासाठी उपदेशवजा विचार/गोष्टी परिपाठातून आणि काही विषयांच्या तासिकांना मुलांच्या कानावर पडत असल्या तरी त्या मनोमन पटण्यासाठी आणि स्वीकारण्यासाठी त्यांच्या मनात विचारमंथन होणे गरजेचे असते. मूल्यवर्धन मधील सहयोगी उपक्रमांत असे विचारमंथन उपदेशविरहित आणि दडपणविरहित, मनमोकळ्या वातावरणात होते. अशा संधी सातत्याने मिळण्याचे नियोजन असते. उपक्रमातील सहयोगी अध्ययन पलतींमधून लोकशाही मूल्ये रुजण्यासाठी देखील मदत होते. या सर्व अनुभवांतून मूल्ये हळूहळू मुलांच्या भावविश्वाचा भाग होऊन त्यांचे प्रतिबिंब मुलांच्या रोजच्या व्यवहारात दिसू लागते.

शाळेतील वातावरणात चैतन्य निर्माण होऊन संविधानातील मूल्ये रुजत असल्याचे आढळून येत आहे. तसेच मूल्यवर्धन उपक्रमांसाठी अनुसरलेली शिक्षणपद्धती शालेय विषयांच्या अध्ययनाची गुणवत्ता वाढविण्यासाठी वापरण्याची मानसिकता काही प्रमाणात निर्माण होत असल्याचे आशादायक संकेत मिळत आहेत. मागील एक–दोन वर्षांत मूल्यवर्धनची अंमलबजावणी झालेल्या शाळांत पूर्वीच्या अनुभवाद्वारे अधिक चांगल्या रीतीने उपक्रमांची अंमलबजावणी होईल असे नियोजन व्हायला हवे. तसेच या वर्षी मूल्यवर्धन सुरू होणाऱ्या शाळांमधे उपक्रम नियमितपणे, क्रमाने आणि त्यांचे मर्म लक्षात घेऊन आयोजित करावेत. आता उपक्रमांविषयीची समज अधिक वाढल्यामुळे उद्दिष्ट तेच ठेवून अधिकाधिक संख्येने समांतर उपक्रम तयार करून आणि वापरून पहावेत. मूल्यवर्धन पुरस्कृत अध्ययन अध्यापन पद्धती वापरून मूल्ये रुजविण्याबरोबरच अध्ययन निष्पत्ती आणि शाळासिद्धी मूल्यांकन यातील काही अपेक्षा पूर्ण करण्यासाठी बराच वाव आहे. हे काम एकेकट्याने न करता शिक्षकांचे अभ्यासगट करून ते पूर्ण करून घेतले तर अधिक प्रभावीपणे होऊ शकेल.

DIECPD प्राचार्य, शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, विस्ताराधिकारी, केंद्रप्रमुख यांनी सदर कार्यक्रमाचा नियमित आढावा घ्यावा. यामुळे चांगल्या कामांची दखल घेतली जाईल, त्यांची देवाणघेवाण होईल, शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी या कार्यक्रमाची उपयुक्ता वाढावी यासाठी चर्चा करून नियोजन करावे या डिजिटल संवादपत्राचे वाचन व त्यावरील चर्चा हा शिक्षण परिषदेतील कार्यक्रमाचा भाग बनावा. आपण सर्व अधिकारी आणि शिक्षक बंधू–भगिनी परिश्रमपूर्वक हा कार्यक्रम पुढे घेऊन जात आहात; तो असाच आणखी पुढे घेऊन जावा यासाठी सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा.

**श्री. विकास गरड, उपसंचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे**


### या संवादपत्रात हे पहाल :


| | |
|---|---|
| मूल्यवर्धन विषयी उपसंचालक यांचे मनोगत | १ |
| तीन महिन्यात ५७१७ शाळांपेक्षा अधिक शाळांना भेटी | १ |
| अधिकारी वर्गाचे अभिप्राय | २ |
| शिक्षकांच्या नजरेतून | ३ |
| मूल्यवर्धन : पुढचे पाऊल | ४ |
| एस. एम. एफ. मास्टर ट्रेनरचे मनोगत | ५ |
| रुजवण मूल्यांची : मूल्यवर्धन प्रशिक्षणातून | ५ |
| मूल्यवर्धन वार्ता | ६ |
| वृत्तपत्रांनी घेतलेली दखल | ७ |
| मान्यवरांचे अभिप्राय | ८ |


## तीन महिन्यात ५७१७ शाळांपेक्षा अधिक शाळांना भेटी

मूल्यवर्धन कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये शाळांमध्ये सुरू असलेल्या उपक्रमांचा पाठपुरावा करणे ही एक महत्त्वाची बाब आहे आणि या पाठपुराव्यामध्ये DIECPD प्रतिनिधी, विषय साधन, व्यक्ती, एस.एम.एफ. चे प्रतिनिधी आणि केंद्रप्रमुख या सर्वांचा समावेश आहे.

शिक्षकांचे उपक्रम अधिक प्रभावी होण्याच्या दृष्टीने संस्थेचे प्रतिनिधी वारंवार शाळाभेटी करून शाळांना साहाय्य करीत असतातच. याशिवाय प्रशासनाच्या फळीतील आणि शाळेच्या सर्वात जवळ असणारी व्यक्ती म्हणजे केंद्रप्रमुख, यांनी या तीन महिन्यात ३४७ शाळाभेटी करून, मूल्यवर्धन उपक्रमांचे निरीक्षण करून MV-App मध्ये त्यांची नोंदही केली. याव्यतिरिक्त बरेचसे केंद्रप्रमुख अनेकदा शाळाभेटी करीत असतात आणि त्यात ते मूल्यवर्धन कार्यक्रमाचा आढावा घेऊन शाळांना मार्गदर्शन करतच असतात, जेणेकरून शाळा प्रमुखांना त्यांच्याकडून प्रोत्साहन मिळत असते आणि या सगळ्यांचा उपयोग मूल्यवर्धन उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यावर होतांना दिसतो. याबरोबरीने DIECPD प्रतिनिधी आणि इतर शासकीय अधिकारी यांनीही ९८ शाळाभेटी करून शिक्षकांना मार्गदर्शन केले आहे. या सर्व सनियंत्रण प्रक्रियेत प्रशासन सक्रिय सहभागी असल्याने मूल्यवर्धनचे अपेक्षित उद्दिष्ट गाठण्यासाठी मदत होत आहे.



### श्री. शरदचंद्र पाटील, प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, गडचिरोली



**मूल्यवर्धन कार्यक्रमाची यशस्वी वाटचाल**

शालेय शिक्षण विभागामार्फत शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी आणि शिक्षक व विद्यार्थी यांच्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास तसेच त्यांच्यात सुसंस्कार व नैतिक, संवैधानिक मूल्यांची रुजवणूक करण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. याचाच भाग म्हणून शांतिलाल मुथ्था फाउंडेशन व महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांमध्ये संवैधानिक मूल्यांची रूजवणूक चांगल्या प्रकारे वाढीस लागावी यासाठी मूल्यवर्धन कार्यक्रम महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यात चांगल्या प्रकारे राबविला जात आहे. गडचिरोली जिल्ह्यातही मूल्यवर्धनच्या नावीन्यपूर्ण उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये मूल्यसंकार वाढीस लागत आहेत. नक्षलप्रभावित गडचिरोली जिल्ह्यात अशा कार्यक्रमांची अत्यंत आवश्यकता आहे. तसेच विविध बोलीभाषा, व्यसनाधीनता व शिक्षणाबाबतची उदासीनता अशा समस्या असतानाही श्रीम. वैशाली येगोलपवार (अधिव्याख्याता) तसेच DIECPD मधील सर्व अधिकारी व विषय सहायक यांच्या साहाय्याने सर्व जि. प. शाळांमध्ये हा कार्यक्रम यशस्वीपणे पोहोचविला जात आहे.

सुरवातीस २०१६ साली चामोर्शी तालुक्यातील तळोधी केंद्रात प्रायोगिक तत्त्वावर सुरू झालेला हा कार्यक्रम सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात संपूर्ण जिल्ह्यातील शाळांमध्ये विद्यार्थी व शिक्षक यांच्यामध्ये मूल्यांची जोपासना होण्यासाठी तसेच सुजाण नागरिक घडविण्यासाठी राबविला जात आहे. शाळाभेटींमध्ये या कार्यक्रमाची चांगली फलनिष्पत्ती दिसू लागली आहे. DIECPD मधील अधिकारी, विषय सहायक व शिक्षण व्यवस्थेतील प्रशासकीय अधिकारी यांचे शाळाभेटीतून व शिक्षक-विद्यार्थी यांच्याशी साधलेल्या संवादातून हा उपक्रम फार महत्त्वाचा आहे हे लक्षात येते व तो गडचिरोलीसारख्या आदिवासी नक्षलप्रभावित जिल्ह्यात समस्येतून मार्ग काढत चांगल्या प्रकारे आपले अस्तित्व दाखवून देत आहे. संस्थेतील अधिकारी व विषय सहायक यांच्या शाळाभेटी दरम्यान या उपक्रमाचा नियमित आढावा घेतला जात आहे. त्यात पुढील बाबी प्रकर्षाने निदर्शनास येत आहेत:- १. विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबाबत समज निर्माण होत आहे. २. विद्यार्थ्यामध्ये स्वयंशिस्त व 'स्व' ची जाणिव निर्माण होत आहे. ३. मूलांच्या बोलण्यात अधिक मोकळेपणा व आत्मविश्वास दिसू लागला आहे. ४. विद्यार्थी शांतता संकेताचे पालन करीत आहेत ५. शाळेत येण्याबाबत नियमितपणा व वक्तशीरपणा येत असल्याचे शिक्षकांचे मत आहे.

पुढील काळात या उपक्रमाच्या माध्यमातून सुसंस्कारित व सुजाण नागरिक घडविण्यासाठी आम्ही आणखी दर्जेदार काम नक्कीच करू. या नावीन्यपूर्ण उपक्रमासाठी सर्व शिक्षकांचे सहकार्य लाभत असून या बाबतीत गडचिरोली जिल्हा नक्कीच पुढे प्रगती करील असा आशावाद व्यक्त करतो.

### श्री. शैलेश मोहनराव पाटील, अधिव्याख्याता, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, जळगाव



'मूल्यशिक्षण' हा शिक्षणाचा गाभा आहे. शिक्षणाचा उद्देश साक्षरतेपासून ते अर्थार्जनापर्यंत आणि जीवन कौशल्ये साध्य होण्यासाठी असला तरी न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या संवैधानिक मूल्यांची रुजवणूक हेच शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट आहे आणि पूर्वापार राहिले आहे. आज सामाजिक स्थितीचे अवलोकन केले असता मूल्यांचा ऱ्हास होताना दिसून येत आहे. माणूस साक्षर होतोय, सुशिक्षित होतोय पण त्याबरोबरच तो आत्मकेंद्रितही होत आहे. वैयक्तिक स्वार्थापोटी नैतिकतेचं भान हरवत आहे. शिक्षण हक्काची जाणीव करून देत आहे पण त्याबरोबर जबाबदारीचे भान विसरले जात आहे. वर्तमानपत्रातून येणाऱ्या प्रामाणिकपणाच्या बातम्या, प्रामाणिकपणा दुर्मिळ होत असल्याची साक्ष देतोय. कारण दुर्मिळ किंवा अपवादाने घडणाऱ्या घटनाच बातमीचा विषय असतात, सामान्य किंवा नियमित घटना बातमीचा विषय होऊ शकत नाहीत. प्रामाणिकपणा ही अपवादाने दिसणारी बाब झाली आहे, असे चित्र दिसून येते. अशावेळी मूल्यशिक्षणाची गरज प्रकर्षाने जाणवते. मूल्ये हा केवळ शिकविण्याचा विषय नाही तर तो रुजविण्याचा भाग आहे. त्यासाठी एका सुनियोजित, पद्धतशीर आणि नियमित प्रयत्नांची गरज आहे. या प्रयत्नांचा एक भाग म्हणून 'मूल्यवर्धन' कार्यक्रम हा एक दिशादर्शक उपक्रम आहे. जळगाव जिल्ह्यातील मूल्यवर्धन कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचे २०१९-२० हे तिसरे शैक्षणिक वर्ष असून सर्व नगरपालिका व जि. प. शाळांमध्ये हा कार्यक्रम राबविला जात आहे. शांतिलाल मुथ्था फाउंडेशनने मुलांमध्ये घटनात्मक मूल्ये रुजावीत आणि ते देशाचे जबाबदार नागरिक व्हावेत या उदाल हेतूने हा कार्यक्रम विकसित केला आहे.

शालेय शिक्षणाची मूलभूत उद्दिष्टे अभ्यासक्रमाच्या माध्यमातून साध्य करताना यातील उपक्रमांचा शिक्षक आणि विद्यार्थ्यांना उपयोग होत आहे. 'राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २००५' मध्ये घटनात्मक मूल्यांच्या आधारावर जी आठ मूल्ये सुचविलेली आहेत, त्यावर मूल्यवर्धन कार्यक्रम आधारित आहे. त्यामुळे सदर कार्यक्रम हा वेगळ्या विचाराने प्रेरित नाही किंवा विशिष्ट समूहाची विचारसरणी लादणारा किंवा त्याचा प्रचार करणारा कार्यक्रम नसून संवैधानिक मूल्यांची रुजवणूक करणारा एक शिस्तबद्ध आणि नियोजित असा कार्यक्रम आहे, हे लक्षात येते. उपक्रमांची एकूण चार विभागात केलेली सुयोग्य मांडणी आणि पाचव्या विभागातील सहयोगी खेळ यांमुळे इयत्तानिहाय अध्ययन निष्पत्ती साध्य करण्याबरोबरच आनंददायी अध्ययनाचा अनुभव विद्यार्थ्यांना मिळतो. उपक्रमांची अंमलबाजवणी, वर्गातील अध्ययन-अध्यापन प्रक्रिया आनंददायी, कृतीआधारित आणि विद्यार्थिकेंद्रीत करण्यास शिक्षकांना सहायक ठरते. शिवाय वर्गातील आंतरक्रिया ज्ञानरचनावादी कशी करता येईल? या प्रश्नाचे उत्तर मूल्यवर्धन उपक्रम देतात. शाळाभेटीदरम्यान मूल्यवर्धन उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी केलेल्या वर्गातील सकारात्मक बदल प्रकर्षाने जाणवतात. वर्गनियमांच्या निर्मितीत विद्यार्थ्यांचा सहभाग असल्याने ते त्यांचे पालन स्वेच्छेने करतात ज्यामुळे विद्यार्थ्यामध्ये स्वयंशिस्त निर्माण होते. स्वतःच्या क्षमता आणि स्वतःला ओळखल्याने मुलांना स्वतःच्या जबाबदाऱ्यांची जाणीव होते. शिक्षक-विद्यार्थी, विद्यार्थी-विद्यार्थी यांच्यात सुसंवादी नातेसंबंध निर्माण झाल्याचा प्रत्यय मूल्यवर्धन वर्गातून दिसून येतो. प्रसंग, गाणी, गोष्टी, नाटिका आणि अभिनयाच्या माध्यमातून विद्यार्थी अभिव्यक्त होतात. शांतता संकेत, जोडीचर्चा, गटचर्चा या वैशिष्ट्यांमुळे वर्गाचे वेगळेपण लक्षात येते.

शालेय विषयांच्या तासिकेला आणि शालेय विषयांच्या घटकांशी समन्वय साधून शिक्षक हे उपक्रम घेतात. मूल्यवर्धन कार्यक्रम संपूर्ण शालेय वातावरण मूल्याधिष्ठित करण्यासाठी उपयुक्त ठरत आहे हे विद्यार्थी वर्तनातील सकारात्मक बदल पालकांना समाधान देणारा आहे.

तर चला मूल्ये रुजवू, जबाबदार नागरिक घडवू.

## मूल्यवर्धन - एक प्रेरक उपक्रम

**सौ. छाया भरत जगदाळे**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जगताप वस्ती, ता. पुरंदर, जिल्हा पुणे



बदलत्या काळाबरोबर शिक्षणाचे संदर्भ आणि शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदललेला आहे. अशावेळी शाळेकडून, शिक्षणाकडून असणाऱ्या समाजाच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी मूल्यवर्धन उपक्रम नक्कीच सकारात्मक आहे. आज-काल जिल्हा परिषद शाळांमधून मुलांकडे फक्त एक चांगले गुण मिळविणारा विद्यार्थी ही अपेक्षा न ठेवता, एक स्वतंत्र व्यक्तिमत्व म्हणून मुलांचा विकास करण्यावर भर आहे. जिल्हा परिषद शाळा डिजिटल स्कूलकडे वाटचाल करीत असताना, माझी शाळा, माझा वर्ग, माझा एकही विद्यार्थी मागे राहता कामा नये, ही भावना दृढ होत असताना, आंम्हा शिक्षकांच्या मदतीला आला तो मूल्यवर्धन कार्यक्रम. वर्तनात घडते ते परिवर्तन। प्रत्यक्ष अनुभवातून होते ते अध्ययन। माझ्यासाठी तर मूल्यवर्धन कार्यक्रम एक प्रेरकच आहे याचा अनुभव मला माझ्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या बाबतीत आला. या शाळेत मी नव्यानेच रुजू झाले होते. माझ्याकडे पहिलीचा वर्ग देण्यात आला होता. मुलांना शाळा, शिक्षक सगळेच नवीन होते. आणि मलाही. पहिले काही दिवस विद्यार्थ्यांची ओळख करून घेण्यात गेले. माझ्या वर्गात १९ च मुले होती. त्यामुळे कुठलाही उपक्रम मला चांगल्या प्रकारे घेता येणार होता. मुले उत्साही आणि चुणचुणीत वाटली. परंतु एक मुलगा (शिवराज) एकही शब्द न बोलणारा, शांत, काहीच न करता फक्त गप्प बसून राहणारा. त्याला काहीही विचारले तरी तो गप्पच असायचा. जबरदस्तीने काही विचारण्याचा प्रयत्न केला तर त्याचे संपूर्ण शरीर थरथर कापायचे. एक दिवस 'तुझे नाव सांग' असे खूप वेळा विचारल्यावर त्याने 'ठिवा' असे सांगितले. सर्व मुले जोरजोरात हसू लागली. मी पुन्हा विचारले तेव्हाही त्याने 'ठिवा'(शिवा) म्हणूनच सांगितले. मला मुलांनी त्याच्याबद्दल माहिती दिली, त्याला बोलता येत नाही. प्रत्यक्षात त्याच्या बऱ्याच समस्या होत्या त्या तो बोलत नव्हता, त्याला शाळा आवडत नव्हती, त्याला शिक्षकांची भीती वाटायची परंतु या सर्व समस्या दूर होणाऱ्या होत्या. त्याचे आई वडील त्याला जबरदस्ती शाळेत सोडून जायचे. त्याच्या पालकांना भेटून त्याची कौटुंबिक पार्श्वभूमी जाणून घेतली. त्याला बोलता येते परंतु तो बोलत नाही, तसेच तुटक-तुटक बोलतो अशा स्थितीमध्ये त्याच्यातील न्यूनगंड दूर करून त्याच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करणे, त्याला इतर मुलांच्या गप्पांत, खेळात सहभागी करून घेणे, त्याच्या मनामधील शाळेविषयीची भीती कमी करून जवळीक निर्माण करणे गरजेचे होते. या कामी मला उपयोगी पडले ते मूल्यवर्धन. मूल्यवर्धन प्रशिक्षणामध्ये आम्हांला विद्यार्थी सर्वांगीण विकासाच्या बाबींवर खूप छान माहिती सांगण्यात आली होती. विविध कृती-उपक्रम, प्रत्यक्ष अनुभव सहयोगी खेळ करून घेतले होते. त्या प्रमाणे माझ्या वर्गात हे उपक्रम राबविण्यास सुरुवात केली. याचा विद्यार्थ्यांसाठी खूप चांगला उपयोग झाला. शिवराजच्या बाबतीत सहयोगी खेळांचा खूपच उपयोग झाला. प्रथम त्याला फक्त एका मित्राबरोबर खेळ दिला. 'जोडीची उडी'. त्यानंतर 'असे उभे राहू','वर वर हवेत'. असे सुरवातीला फक्त कृतींचे खेळ दिले. तो मुलांमध्ये सहभागी होऊ लागला. त्यानंतर प्राण्यांचे आवाज, गटात गोष्ट सांगणे- गोष्ट तयार करण्यासाठी गटातील सर्व विद्यार्थ्यांनी एक-एक, दोन-दोन वाक्ये सांगून गोष्ट तयार करायची असते. गोष्ट तयार करण्यासाठी तसेच आपला गट जिंकून देण्यासाठी शिवराज एखादे वाक्य सांगू लागला. वर्तुळ शब्दखेळ यामध्ये एक-दोन नावे तो सांगू लागला, या सहभागामुळे त्याचा बोलण्यातील न्यूनगंड कमी होत गेला व त्याच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण झाला-तो मूल्यवर्धन कार्यक्रमातील विद्यार्थी व शिक्षक उपक्रम पुस्तिकांमुळेच. तसेच तालुका समन्वयक, केंद्रप्रमुख यांचे मार्गदर्शन व शाळेतील शिक्षकांचे सहकार्य मिळाले. त्याच्या आनंददायी शिकण्यास, वाचादोष नाहीसा करण्यास, शिवराज बरोबर इतर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासास मदत केल्याबद्दल मूल्यवर्धन कार्यक्रम व मुथ्था फाउंडेशनचे शतशः आभार!!

## मूल्यवर्धन : एक आश्वासक उपक्रम

**श्री. विश्वनाथ पांडुरंग सांगोलकर**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बेणापूर, ता. खानापूर, जिल्हा सांगली



चांगल्या विचारांतूनच चांगली व्यक्ती घडत असते. खरच विद्यार्थ्यांना भारताचे सुजाण नागरिक घडवायचे असेल तर त्यांच्यामध्ये लोकशाही मूल्ये रुजणे आवश्यक आहे. सध्या विकृत गोष्टींकडे पटकन आकर्षित होणाऱ्या समाजात गरज आहे ती मूल्याधिष्ठित विचारांची रुजवणूक करण्याची. खऱ्या अर्थाने विद्या प्राधिकरण पुणे व शांतिलाल मुथ्था फाउंडेशन यांनी ही जबाबदारी स्वीकारली आहे. मूल्यवर्धन उपक्रमात प्रेरक म्हणून सहभागी होताना अनेक शिक्षक बंधुभगिनींनी नेहमी एक प्रश्न विचारला की, 'मूल्यांची शिकवण आपण नेहमीच विद्यार्थ्यांना देत असतो. तरीही मूल्यवर्धन उपक्रम वेगळ्या पद्धतीने राबविण्याची गरज काय?' या प्रश्नाचे उत्तर खऱ्या अर्थाने मूल्यवर्धन उपक्रम राबविल्या नंतरच मिळते. बालकांना एखाद्या मूल्याची शिकवण देणे व ते मूल्य त्याच्यामध्ये रुजविणे या मध्ये नक्कीच फरक आहे. मूल्यवर्धन उपक्रमाचा मुख्य पायाच राज्यघटनेतील स्वातंत्र्य, न्याय, समता व बंधुता या मूल्यांवरती आधारलेला आहे. ही मुख्य मूल्ये व त्याला जोडून येणारी स्वायत्तता, जबाबदारी, चिकित्सक व सर्जनशील विचार, विविधतेचा आदर, मानवी प्रतिष्ठेचा आदर, सुसंवादी नातेसंबंध, इतरांबद्दल आस्था व सक्रिय सहभाग ही उपमूल्ये बालवयातच बालकाच्या अंगी रुजविणे ही काळाची गरज बनली आहे.

आज समाजात व देशात बालगुन्हेगारी, स्त्रियांवरील अत्याचार, जातीय दंगली तसेच दहशतवादाला खतपाणी घालण्यासारखी विध्वंसक व विघातक कृत्ये घडताना दिसत आहेत. रस्त्यावर एखादा अपघात जरी घडला तर आजचा आपला तरुण मदत करण्यापेक्षा अपघाताचे चित्रीकरण करण्यात व सेल्फी काढण्यात गुंतलेला पहायला मिळतो. इतक्या मोठ्या प्रमाणात आपल्या संवेदना बोथट बनल्या आहेत.

अशा वेळी एक शिक्षक म्हणूनच नव्हे तर भारताचा सुजाण नागरीक घडविण्याच्या प्रक्रियेतील जबाबदार घटक म्हणून प्रश्न पडतो की, तरुणाईमधील बंधुता कुठे लोप पावली? कुठे गेली यांच्यातील स्वातंत्र्य, न्याय व समता यांची जाणीव? ही तरुणाई प्राथमिक शिक्षण घेतलेलीच आहे ना? आपण यांनाही मूल्यशिक्षणाचे धडे दिले होते ना? होय! आपण यांना मूल्यशिक्षणाचे धडे दिले होते पण मूल्यांची रुजवणूक करून घेतली नव्हती. प्राथमिक शिक्षणातील ही कमतरता भरुन काढण्याचे काम मूल्यवर्धन उपक्रमाने केले आहे.

विद्यार्थी उपक्रम पुस्तिकेत प्रत्येक उपक्रमातून मूल्यांची रुजवणूक करण्यास आवश्यक उपक्रमांचा व कृतींचा समावेश केला आहे. हे उपक्रम वर्गात व शाळेत राबवीत असताना विद्यार्थ्यांना एक वेगळाच आनंद मिळतो. मूल्यवर्धन उपक्रमामुळे निश्चितपणे विद्यार्थ्यांच्या वर्तनात बदल झाला आहे. सर्जनशील विचार व चिकित्सक वृत्ती यांचा विकास झाला आहे. वर्गनियंत्रणातही या उपक्रमांमुळे मदत झाली आहे. या उपक्रमाची उपयुक्तता पाहता याची व्याप्ती इयत्ता ६ वी ते ८ वी साठीही वाढविणे गरजेचे आहे असे मला वाटते.



| अ. क्र. | सहभागी तालुके | |
|---|---|---|
| १ | जिल्हा | तालुका |
| २ | अहमदनगर | पारनेर |
| ३ | अकोला | मुर्तिजापूर |
| ४ | औरंगाबाद | वैजापूर |
| ५ | भंडारा | तुमसर |
| ६ | बुलडाणा | खामगाव |
| ७ | चंद्रपूर | चंद्रपूर |
| ८ | जळगाव | अमळनेर |
| ९ | जालना | जालना |
| १० | कोल्हापूर | हातकणंगले |
| ११ | लातूर | औसा |
| १२ | नांदेड | लोहा |
| १३ | नंदुरबार | शहादा |
| १४ | नाशिक | इगतपुरी |
| १५ | उस्मानाबाद | कळंब |
| १६ | पालघर | पालघर |
| १७ | पुणे | पुरंदर |
| १८ | रायगड | माणगाव |
| १९ | सांगली | शिराळा |
| २० | सातारा | कराड |
| २१ | सोलापूर | उत्तर सोलापूर |
| २२ | ठाणे | कल्याण |
| २३ | नागपूर | काटोल |
| २४ | वर्धा | सेलू |
| २५ | वाशिम | मंगरूळपीर |
| २६ | सिंधुदुर्ग | कणकवली |

मूल्यवर्धन कार्यक्रम महाराष्ट्र सरकारने २०१५ मध्ये स्वीकारला आणि आता तो राज्याचा कार्यक्रम म्हणून वेगाने विस्तारत आहे. शैक्षणिक वर्ष २०१८–१९ च्या अखेरपर्यंत ४०,००० प्राथमिक शाळांमधील ९७,००० शिक्षकांसाठी मूल्यवर्धन प्रशिक्षण आयोजित केले गेले. नोव्हेंबर २०१९ अखेरीस राज्यातील ६७,००० प्राथमिक शाळांपर्यंत हा कार्यक्रम पोहोचून एकूण १,९५,००० शिक्षकांचे प्रशिक्षण पूर्ण होईल. अशापद्धतीने २०१९–२० या शैक्षणिक वर्षात राज्यातील मराठी, हिंदी, इंग्रजी आणि उर्दू माध्यमांच्या जिल्हा परिषद आणि महानगरपालिकांच्या सर्व प्राथमिक शाळांपर्यंत मूल्यवर्धन कार्यक्रम पोहोचणार आहे.

ऑगस्ट २०१८ मध्ये माननीय मुख्यमंत्री यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे मूल्यवर्धन कार्यक्रमाचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी मूल्यवर्धनच्या रूपाने महाराष्ट्रात चालू असलेल्या गुणवत्तापूर्ण कार्यक्रमाचा लाभ मुलांना सातत्याने मिळत राहावा यासाठी शासकीय यंत्रणेमध्ये मूल्यवर्धन कार्यक्रमाच्या अनुषंगाने शाश्वत दृष्टिकोन व कौशल्ये विकसित व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली. यासाठी विशेष प्रकल्प राबवावा असे देखील मुख्यमंत्र्यांनी या वेळी सुचविले. अशाप्रकारे महाराष्ट्रातील २५ जिल्ह्यांतील प्रत्येकी एक तालुका व प्रत्येक तालुक्यातील चार केंद्रे अशी १०० केंद्रांची निवड करून त्यांच्यासोबत मूल्यवर्धनचे पुढचे पाऊल उचलले गेले. या शैक्षणिक वर्षात वेगवेगळे प्रयत्न करून केंद्रांची आणि पर्यायाने शाळांची गुणवत्ता सुधारण्यासाठीचे अधिक प्रयत्न केले जाणार आहेत.

**या कार्यक्रमाचे मुख्य उद्देश पुढीलप्रमाणे आहेत :**

१. तालुका आणि केंद्रपातळीवर मुख्याध्यापक आणि शिक्षक यांना शैक्षणिक बाबींसाठी साहाय्य करण्यासाठी सक्षम यंत्रणा विकसित करणे.
२. मुख्याध्यापकांनी शाळेमध्ये मूल्याधारित नेतृत्व दर्शविणे आणि सुरक्षित, धोकाविरहित, सर्वसमावेशी, न्याय्य आणि न्यायसंगत वातावरण तयार करणे.
३. शिक्षकांनी वर्गांमध्ये सुरक्षित, काळजीमुक्त व बालकेंद्री वातावरण निर्माण करणे व मूल्याधिष्ठित कौशल्ये विकसित होण्यास पूरक पद्धतींचा वापर करणे.
४. विद्यार्थ्यांनी जबाबदार नागरिक होण्यासाठी सामाजिक व भावनिक जीवन कौशल्ये आणि दृष्टिकोन अंगीकारणे.

**वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी खालीलप्रमाणे ४ स्तरांवर प्रशिक्षण योजना आखली गेली :**

१. जिल्हा मूल्यवर्धन समन्वयक : कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी शासनाने नेमलेल्या DIECPD च्या जिल्हा मूल्यवर्धन समन्वयकांसाठी ३ दिवसीय प्रशिक्षण जुलै २०१९ या महिन्यात पुणे येथे आयोजित केले गेले.
२. केंद्रप्रमुख : विभागीय स्तरावर केंद्रप्रमुखांसाठी जुलै आणि ऑगस्ट २०१९ या दोन महिन्यांमध्ये प्रशिक्षण आयोजित केले गेले.
३. मुख्याध्यापक : ऑगस्ट आणि सप्टेंबर २०१९ या दोन महिन्यांत तालुका स्तरावर मुख्याध्यापक यांच्यासाठी प्रशिक्षण आयोजित केले गेले.
४. शिक्षक : ऑगस्ट आणि सप्टेंबर २०१९ या दोन महिन्यांत केंद्र स्तरावर सर्व शिक्षकांसाठी उजळणी प्रशिक्षण आयोजित केले गेले.

**वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शांतिलाल मुथ्था फाउंडेशनची भूमिका :**

१. प्रशिक्षण
२. निरीक्षण
३. दस्तावेजीकरण आणि प्रसार

वरील तीनही भूमिका पार पाडण्यासाठी शांतिलाल मुथ्था फाउंडेशनने एक विशेष टीम नेमलेली आहे. ही टीम शाळेशी संबंधित केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक आणि शिक्षक यांना प्रशिक्षण देणे, कार्यक्रमाचे निरीक्षण करून आढावा घेणे आणि शाळांमध्ये राबविलेल्या चांगल्या प्रयत्नांचे संकलन करणे तसेच विविध यशोगाथा मिळवून इतर शाळांपर्यंत पोहोचविणे इ. कामे करणार आहे.

**मूल्यवर्धन : पुढचे पाऊल कार्यक्रमाचा सर्व शासकीय अधिकाऱ्यांना परिचय :**

दिनांक ८ जुलै २०१९ रोजी, भारतीय जैन संघटना शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्प, वाघोली येथे या कार्यक्रमामध्ये समाविष्ट असलेल्या २५ जिल्ह्यांतील सर्व DIECPD चे अधिव्याख्याते, विषय साधन व्यक्ती (BRC) आणि प्रत्येक जिल्ह्यांतून निवडलेल्या प्रत्येकी ४ केंद्रांचे केंद्रप्रमुख यांना कार्यक्रमाची ओळख करून देणे आणि कार्यक्रमाच्या अंमलबजावणीतील प्रत्येकाच्या जबाबदाऱ्या आणि भूमिका स्पष्ट करणे या हेतूने एक दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

या कार्यक्रमासाठी डॉ. दत्तात्रय मेंढेकर (उपविभागप्रमुख, अभ्यासक्रम विकसन विभाग, विद्या प्राधिकरण), डॉ. इरफान इनामदार (ज्येष्ठ अधिव्याख्याता, DIECPD, सोलापूर) श्री. विद्याधर शुक्ल (निवृत्त उपसंचालक, विद्या प्राधिकरण), श्री. व्ही. वेंकटरमणा (मुख्य कार्यकारी अधिकारी, शांतिलाल मुथ्था फाउंडेशन), श्रीम. मीनल दशपुत्रे (विभाग प्रमुख, प्रशिक्षण आणि गुणवत्ता, शांतिलाल मुथ्था फाउंडेशन), श्री. लक्ष्मीनारायण (राज्य व्यवस्थापक, शांतिलाल मुथ्था फाउंडेशन) आदी उपस्थित होते.

या कार्यकमादरम्यान मान्यवरांनी मूल्यवर्धन कार्यक्रमाचे पुढचे पाऊल टाकण्याची गरज व्यक्त करून हा कार्यक्रम यासाठीचा पूरक प्रयत्न आहे हे सुचविले. मूल्ये रुजविण्यासोबतच मुलांचा सर्वांगीण विकास करण्याच्या हेतूने हे उचललेले पुढचे पाऊल यशस्वी होण्यासाठी सर्वांचे सहकार्य मिळाले तर नक्कीच पूर्ण करता येईल. या अनुषंगाने सर्व मान्यवरांनी, उपस्थितांना कार्यक्रमाची रूपरेषा समजावून सांगून आपली भूमिका प्रभावीपणे पार पाडण्याचे आवाहन केले.

**केंद्रप्रमुखांची भूमिका स्पष्ट करण्यासाठीच्या विभागीय कार्यशाळा :**

या कार्यकमात समाविष्ट २५ जिल्ह्यांतून निवडलेल्या प्रत्येकी ४ केंद्रांच्या सर्व केंद्रप्रमुखांना कार्यक्रमाच्या अंमलबजावणीतील आपली भूमिका स्पष्ट व्हावी या हेतूने दोन दिवसीय कार्यशाळा घेण्यात आल्या. २५ जिल्ह्यांना पुणे, नागपूर, औरंगाबाद, कोल्हापूर अशा चार भागांत विभागले गेले आणि पुणे, नाशिक, जालना आणि नागपूर अशा अनुक्रमे चार ठिकाणी हे विभागीय प्रशिक्षण संपन्न झाले. प्रशिक्षणासाठी निवडलेल्या प्रत्येक जिल्ह्यातील प्रत्येकी चार केंद्रांचे केंद्रप्रमुख आणि त्यांच्या मदतीला त्यांच्याच केंद्रांचे केंद्रीय मुख्याध्यापक यांचा प्रशिक्षणात सहभाग होता.

या अनुषंगाने शांतिलाल मुथ्था फाउंडेशनच्या प्रशिक्षकांच्या माध्यमातून सर्व केंद्रप्रमुखांना कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचे स्वरूप स्पष्ट केले गेले. कार्यक्रमामुळे शाळांची गुणवत्ता सुधारण्यासाठीचे प्रयत्न आणि पर्यायाने केंद्रांची गुणवत्ता वाढण्यासाठी मिळणारा हातभार आणि हे सर्व करण्यासाठी केंद्रप्रमुख म्हणून त्यांची भूमिका या सर्वांवर सविस्तरपणे चर्चा करण्यात आली.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्वांचे सहकार्य मिळाले तर होणाऱ्या सकारात्मक बदलांवरही चर्चा झाली त्यावेळी केंद्रप्रमुखांनी त्यांची भूमिका अधिक प्रभावीपणे निभावली जाईल असे आश्वासनही दिले. विद्या प्राधिकरणाने त्यांच्यावर दाखविलेल्या विश्वासाबद्दल धन्यवाद व्यक्त करून या कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे आश्वासन दिले.

## मूल्यवर्धन प्रशिक्षक म्हणून माझी जडण - घडण

**श्री. बाळासाहेब नामदेव ठोंबरे,**
प्रशिक्षक व जिल्हा समन्वयक, बुलडाणा आणि चंद्रपूर, शांतिलाल मुथ्था फाउंडेशन



शांतिलाल मुथ्था फाउंडेशन या संस्थेद्वारे महाराष्ट्रातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये राबविल्या जाणाऱ्या मूल्यवर्धन कार्यक्रमात मला सन २०१० पासून ते आजपर्यंत संपूर्ण महाराष्ट्रभर मूल्यवर्धन प्रशिक्षक म्हणून काम करता आले. आजपर्यंत महाराष्ट्रात शिक्षकांसाठीच्या १५१ कार्यशाळांमध्ये प्रशिक्षक म्हणून काम करण्याची संधी मिळाली. याच दरम्यान मूल्यवर्धन कार्यक्रम समजून घेऊन त्याला दैनंदिन जीवनाशी जोडतानाचे माझे अनुभव मांडण्याची संधी या डिजिटल वार्तापात्राद्वारे मला उपलब्ध करून दिल्याबद्दल मी संस्थेचा शतशः आभारी आहे.

माझ्यावर मूल्यांचा पहिला संस्कार माझ्या आजीने केला असे मला वाटते. माझ्या आजीकडे माझे शिक्षण पूर्ण झाले. माझ्या आजीला कधी वाचन लेखन करता आले नाही. परंतु तिने माणसे, घटना, जीवनप्रवाह आणि निसर्ग हे नीट समजून घेतले होते. रोज भल्या पहाटे पाच वाजता घरातील कंदील पेटवून मला अभ्यासासाठी उठवायची. जणू विकसित भारताचा एक जबाबदार नागरिक घडविण्याची जबाबदारी तिने उचलली असावी, असे वाटते. पण या गोष्टीचा मला कधीच राग आला नाही. गावातील कोणीही घरी आले तरी 'अरे बाबा, शेतातली भाजी घेऊन जा तुला' असे प्रेमाने म्हणायची. आजी म्हणजे मोकळ्या मनाचे एक व्यासपीठ होते. आजीकडे बघून सर्व घराला प्रेम, आपुलकी, आधार, संस्कार, आदर, सुसंवाद आणि नैतिकतेने एकत्रित बांधून ठेवणारा निर्मळ झरा मला उलगडत होता. माझं संपूर्ण गावच माझं कुटुंब होत. सर्वजण एकमेकांच्या सुख-दुःखात एकत्र येत एकमेकांना आधार देत. खऱ्या अर्थाने माझ्यात या छोट्या घरातून 'हे विश्वचि माझे घर' ही संकल्पना रुजत गेली.

माझे शिक्षण पूर्ण झाल्यावर २०१० मध्ये आष्टी तालुक्यातील जि. प. प्रा. शाळा, लमाणतांडा (जोमदार) या शाळेत मूल्यवर्धन शिक्षक म्हणून काम करण्याची सुवर्ण संधी मला मिळाली. शाळेत बंजारा समाजाची मुले जास्त होती, शिवाय ते लमाणी बोलीभाषा बोलणारे; जी भाषा माझ्यासाठी नवखी होती. एक दिवस मी, 'आई तुझा मी नंदन आहे, पायी तुझ्या हे वंदन आहे' हे गीत म्हटले आणि त्याच क्षणी एक मुलगी मला म्हणाली, 'कतारा भारी गीत गायो तू सर'. सर्वांनी टाळ्या वाजवून माझे स्वागत केले आणि मुलांसाठी मी या छोट्या कृतीतून खूप काही देऊन गेलो असे माझ्या मनाला उगाच वाटून गेले. हळूहळू विद्यार्थ्यांबरोबर ओळख झाली. शाळेमध्ये मुलगा-मुलगी हा भेद खूपदा जाणवायचा, जो बदलण्यासाठी खूपदा प्रयत्नही केले पण हवे तितके यश मिळत नव्हते. मूल्यवर्धन उपक्रमातील जोडीचर्चा, गटचर्चा, सहयोगी खेळ इ.च्या माध्यमातून हे भेद कमी होऊन सर्वजण मिळून मिसळून राहताना दिसू लागले. शाळेतील कामेही एकत्र करू लागले आणि शाळेतही सोबत येताना दिसू लागले.

या शाळेच्या सर्व संबंधितांसोबत निखळ निर्मळ नाते वृद्धिंगत होत असतानाच माझी अवघ्या चारच महिन्यात मूल्यवर्धन प्रशिक्षक म्हणून निवड करण्यात आली आणि मला शाळा सोडून पुण्याला यावे लागले. मला हे जमेल का? हे काम स्वीकारू का नको? असे अनेक प्रश्न माझ्या मनात येत होते. मग मी ठरविले की करून तर बघू, अशा पद्धतीने माझ्यातील मूल्यवर्धन प्रशिक्षकाच्या जडण-घडणीस सुरुवात झाली. एक उत्तम प्रशिक्षक होण्यासाठी संस्थेने पुण्यामधील शिक्षण क्षेत्रात नवनवीन प्रयोग करणाऱ्या 'ज्ञानप्रबोधिनी' संस्थेत व्यक्तिमत्त्व विकास आणि व्यावसायिक विकासासाठीची विविध प्रशिक्षणे मिळाली. वरिष्ठ अधिकाऱ्यांचेही मार्गदर्शन नेहमी मिळत असे. या सर्वांचा उपयोग मी खेड्यात, शहरात वेगवेगळ्या प्रशिक्षणांमध्ये करीत होतो. शिक्षकांच्या खूप लहान मोठ्या शंका सोडवीत होतो, प्रात्यक्षिके दाखवीत होतो. बऱ्याच वेळा शिक्षक माझ्या प्रशिक्षणाला दाद देऊ लागले. त्यातून प्रशिक्षक म्हणून माझा आत्मविश्वास वाढत राहिला.

याच दरम्यान धुळे जिल्ह्यातील जि. प. प्रा. शाळा जिरवे या ठिकाणी शाळाभेटी दरम्यान आलेला एक अनुभव. वर्ग उपक्रमाचे निरीक्षण केल्यानंतर शाळेच्या मध्यान्ह भोजनाचा आस्वाद घेऊन माझी प्लेट धुण्यासाठी मी स्वतः गेलो तेव्हा काही मुली आल्या आणि मला प्लेट धुवू नका असे म्हणाल्या. यावर मी म्हणाले, ''अगं, मी भात खाल्ला तर माझी प्लेट मीच धुणार''. यावर त्या मुली म्हणाल्या, ''तुम्ही पाणी जास्त सांडाल.'' त्यांचे हे बोल ऐकून मी अवाक् झालो आणि या असें का म्हणाल्या याचा विचार करू लागलो. नंतर माझ्या लक्षात आले की, शाळेत पाण्याची कमतरता लक्षात घेऊन मुलांनी काही नियम केले होते ज्यात 'आपण पाण्याची बचत करू' चा समावेश होता. पाण्याची नासाडी होऊ नये म्हणून मोठ्या वर्गातील मुलांना लहान मुलांच्या प्लेट धुण्याची जबाबदारी दिली होती. शाळेचा हा प्रयत्न पाहून खूप छान वाटले आणि आपले मूल्यवर्धन खऱ्या अर्थाने शाळेत प्रतिबिंबित झाल्याचे पाहून समाधानी झालो. मीच शिक्षकांना, मुलांना शिकवतो हा माझा समज या अशा प्रसंगातून गळून पडला असे प्रसंग मला समृद्ध करत गेले.

मूल्यवर्धनच्या वाटेवर दीर्घकाळ वाटचाल करताना मला हे जाणवत गेले की स्वजाणीव, स्वतःशी संवाद साधणे, सकारात्मक विचार करणे, कामातील एकाग्रता टिकवून त्यात आनंद शोधणे, सर्वांशी सुसंवाद साधणे, व्यक्तीच्या प्रतिष्ठेचा आदर करणे तसेच नातेसंबंध विषयक कौशल्य यांचा कुठे तरी विसर पडत चालला आहे. मूल्यवर्धन प्रशिक्षणातून या बाबींची पूर्तता मला जाणीवपूर्वक करता आली. स्वतःसाठी तर सगळेच जगतात, परंतु जो इतरांसाठी काही तरी चांगले करतो त्याच्यासाठी सकारात्मक ऊर्जेचे दालन नेहमी खुले असते. आपले जीवन खूप सुंदर आहे, जगण्यातील आनंद प्रत्येकाने शोधण्याची गरज आहे. समग्रपणे जीवन जगणे यातून आनंदी वृत्ती तयार होते जी जीवनाकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करते. प्रत्येकाला स्वतःच्या क्षमतांचा पूर्णपणे उपयोग करायचा असेल तर स्वतःची ओळख होणे व सकारात्मक विचारांचा अवलंब करणे महत्वाचे आहे. म्हणून सकारात्मक विचारसरणी असणारी सृजनशील माणसे समाजात आपले योगदान प्रभावीपणे देऊ शकतात. या सर्व गोष्टी करण्यासाठी लागणारी कौशल्ये या मूल्यवर्धन कार्यक्रमात एक शिक्षक म्हणून आणि नंतर प्रशिक्षक म्हणून कार्य करताना विकसित होत गेली. मूल्ये दुसऱ्यांमध्ये रुजविता रुजविता खरे सांगायचें तर माझ्यामध्येही रुजत गेली. यातूनच मूल्यवर्धन खऱ्या अर्थाने माझ्या जगण्याचे सूत्र बनले. अजूनही हा प्रवास सुरूच आहे आणि पुढेही तसाच सुरू राहणार आहे.



### रुजवण मूल्यांची : मूल्यवर्धन प्रशिक्षणातून

मूल्यवर्धन प्रशिक्षणातून काय आम्हां भेटले
कृती, उपक्रम अन् खेळातून मूल्य अंगी रुजले

स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता गुण सोबती आले
जबाबदारी अन् कर्तव्यठसे मनावरी उमटले

तंत्र कौशल्य, स्व व्यवस्था कल्पना अंगी रुजल्या
शांततेने अन् चर्चेने लाख युक्त्या योजिल्या

जाणवया उपक्रमातील कृती आणि कल्पना
मित्र सारे एक झाले ना भीती ना संकोच कुणा


मूल्ये अन् सहयोगी पद्धती प्रेरक आम्हां समजाविती
स्लाईड ppt अन् व्हिडीओ संगणकावर लावती

प्रेरक आमुचे गुरू हे आमुचे हात जोडून धन्यवाद तुम्हां
सार्थक झाले ३ दिवसाचे हर्ष जाहला आम्हां

**कवी:- श्री. हनुमान नारायण गिराम**
शाळा:- जि. प.शाळा फुणगूस मराठी,
ता.संगमेश्वर, जि. रत्नागिरी



## डॉ. दत्तात्रय मेंढेकर यांची जिल्ह्यांच्या DIECPD अधिव्याख्यात्यांसोबत व्हिडियो कॉन्फरन्सद्वारे आढावा बैठक




महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण) अभ्यासक्रम विकसन विभागाचे प्रमुख डॉ. दत्तात्रय मेंढेकर तसेच त्या विभागातील श्रीम. पूनम घुले यांनी 'मूल्यवर्धन : पुढचे पाऊल' कार्यक्रमांतर्गत समाविष्ट २५ जिल्ह्यांच्या DIECPD च्या प्रतिनिधींसोबत व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे १३ ऑगस्ट, २०१९ रोजी शांतिलाल मुथ्था फाउंडेशन च्या कार्यालयातून आढावा बैठक घेतली. या आढावा बैठकीमध्ये २२ प्रतिनिधींचा समावेश होता. यासाठी पुणे, मराठवाडा आणि विदर्भ असे तीन विभाग करण्यात आले होते.

आढावा बैठकीदरम्यान डॉ. दत्तात्रय मेंढेकर यांनी कार्यक्रमाचे कौतुक करून इतर सर्व सहभागींना आतापर्यंत त्यांच्या जिल्ह्यांत कार्यक्रमाअंतर्गत कोणकोणती प्रशिक्षणे झाली, आणि पुढील प्रशिक्षणाचे नियोजन कसे आहे यासंदर्भात जाणून घेतले. याशिवाय या सर्व प्रशिक्षणासाठी अधिव्याख्यात्यांनी आवर्जून उपस्थित राहून संबधितांना मार्गदर्शन करण्याचे आवाहनही केले.

या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी आणि आपल्या केंद्रांतील शाळांमध्ये अपेक्षित बदल घडवून आणण्यासाठी DIECPD पातळीवरील सर्व यंत्रणांनी उद्युक्त व्हावे याविषयी मार्गदर्शन केले. यासाठी सर्व प्रकारच्या प्रशिक्षणासाठी आवश्यक व्यवस्था उपलब्ध करून देणे, प्रशिक्षणार्थींच्या उपस्थितीची खातरजमा करणे, शाळाभेटी करून शाळांमधील कार्यक्रमाची अंमलबजावणी जाणून घेऊन अपेक्षित मार्गदर्शन करणे, शिक्षण परिषदेमध्ये कार्यक्रमाचा समावेश करणे, तालुकास्तरावर नियमित आढावा बैठका घेऊन सर्वांना प्रोत्साहन देणे अशा विविध बाबींची जबाबदारी DIECPD ने स्वतः घ्यावी याबद्दलचे मार्गदर्शनही केले.

या बैठकीचे वैशिष्ट्य म्हणजे विद्या प्राधिकरणचे (एस.सी.ई.आर.टी.) प्रतिनिधी म्हणून डॉ. दत्तात्रय मेंढेकर यांची सर्व DIECPD च्या जिल्ह्यांच्या प्रतिनिधीं सोबतची पहिली व्हिडिओ कॉन्फरन्स होय. अशी आढावा बैठक पुढे पुन्हा प्रत्येक दोन महिन्यातून एकदा घेतली जाईल अशी ग्वाही डॉ. दत्तात्रय मेंढेकर यांनी यावेळी सहभागींना देऊन पुढील कामासाठी शुभेच्छा दिल्या.

## महाराष्ट्राच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये मूल्यवर्धनचा मोलाचा वाटा




महाराष्ट्र सरकारच्या शिक्षण क्षेत्रातील मागील काही वर्षांच्या कामगिरीचा आलेख मांडताना त्यात मूल्यवर्धनचा ठळकपणे उल्लेख करण्यात आला आहे. महाराष्ट्र सरकारद्वारे दिनांक ४ सप्टेंबर २०१९ रोजी विविध वृत्तपत्रांत प्रकाशित करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये मूल्यवर्धन कार्यक्रमाचा विशेष उल्लेख करण्यात आला आहे.

## एस.सी.ई.आर.टी. अभ्यासक्रम विकसन विभागाच्या अधिव्याख्याता श्रीम. पुनम घुले यांची पारनेर तालुक्यातील शाळांना भेटी



२१ सप्टेंबर २०१९ रोजी पारनेर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना विद्या प्राधिकरण पुणे मधील अभ्यासक्रम विकसन विभागाच्या अधिव्याख्याता श्रीम. पूनम घुले व शांतिलाल मुथ्था फाउंडेशनच्या प्रतिनिधी श्रीम. कांचन भस्मे यांनी पवारवाडी आणि जांभूळवाडी या शाळांना भेटी देऊन 'मूल्यवर्धन : पुढचे पाऊल' या कार्यक्रमाचा आढावा घेतला. त्यावेळी इयत्ता ४थी च्या वर्गावर 'माझे मत' ह्या उपक्रमाचे निरीक्षण करून शिक्षक, विद्यार्थी यांच्याशी संवाद साधला. त्यावेळी विचारलेल्या प्रश्नांना विद्यार्थ्यांनी समर्पक अशी उत्तरे दिली. शाळेमध्ये वर्षभर राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांचे अवलोकन केले. शाळेच्या गुणवत्तेबाबत समाधान व्यक्त केले.

मूल्यवर्धन मधील इयत्ता ३री च्या विद्यार्थ्यांनी समग्र शाळा दृष्टिकोन अंतर्गत 'व्यावसायिक मुलाखत' कार्यक्रम घेतला. विशेष म्हणजे या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विद्यार्थ्यांनीच केले. विद्यार्थ्यांमध्ये आंतरव्यक्ती कौशल्य व सकारात्मक नातेसंबंध दिसून आले. तसेच उपक्रमामध्ये १ली चे विद्यार्थीही स्वतंत्रपणे विचार करून परखडपणे आपले मत मांडताना दिसून आले. मूल्यवर्धन कार्यक्रम विद्यार्थी व शिक्षक यांच्यासाठी कसा उपयुक्त आहे आणि तो प्रभावीपणे कसा राबवावा याबाबत अधिव्याख्याता श्रीम. पूनम घुले यांनी मार्गदर्शन केले व शिक्षकांना पुढील कामासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी सुपा बीटचे विस्तार अधिकारी श्री. संभाजी झावरे, सुपा केंद्राचे केंद्रप्रमुख श्री. बाळासाहेब साबळे, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीम. ज्योती कोल्हे, उपमुख्याध्यापिका श्रीम. वर्षा साठे हे सर्वजण उपस्थित होते.

## गुजरात राज्यात मूल्यवर्धन राबविणार



महाराष्ट्र आणि गोवा राज्यानंतर मूल्यवर्धन कार्यक्रम गुजरात राज्यात प्रवेश करीत आहे. याबाबत ५ सप्टेंबर २०१९ रोजी अहमदाबाद येथे गुजरात सरकार आणि शांतिलाल मुथ्था फाउंडेशन यांच्या मध्ये करार करण्यात आला. गुजरात सरकारच्या वतीने श्री. टी. एस. जोशी (संचालक, शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, गुजरात) तसेच श्री. व्ही. वेंकटरमणा (मुख्य कार्यकारी अधिकारी, शांतिलाल मुथ्था फाउंडेशन, पुणे) यांनी करारावर स्वाक्षरी केली. यावेळी गुजरात राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री. विजय रूपानी, राज्यपाल श्री. आचार्य देवव्रत, शिक्षणमंत्री श्री. भूपेंद्रसिंह चूडासामा, प्राथमिक आणि उच्च शिक्षण राज्यमंत्री श्रीम. विभावरीबेन दवे आणि शिक्षण विभागाच्या मुख्य सचिव श्रीम. अंजू शर्मा यांची प्रमुख उपस्थिती होती.

या करारानुसार गुजरात राज्यातील सुमारे ३३,००० प्राथमिक शाळा आणि ५५ लक्ष विद्यार्थ्यांपर्यंत मूल्यवर्धन कार्यक्रम पोहोचणार आहे. पहिल्या वर्षी प्रायोगिक तत्त्वावर पोरबंदर या जिल्ह्यात कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

गुजरातच्या शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेद्वारे मूल्यवर्धन कार्यक्रमाच्या शैक्षणिक साहित्याचे परीक्षण करण्यासाठी गुजरातच्या तज्ञ समितीची शांतिलाल मुथ्था फाउंडेशनच्या अधिकाऱ्यांसोबत पहिली बैठक २८ ऑगस्ट २०१९ रोजी अहमदाबाद येथे झाली.

## मूल्यवर्धन : एक आनंदयात्रा



'आपण फ्रीज, टी.व्ही. वगैरे सारखी एखादी मोठी गोष्ट खरेदी करतो, त्यावेळी त्याबरोबर एक छोटी पण अतिशय महत्त्वाची गोष्ट मिळते. ती कोणती?' एका कार्यशाळेत आम्हाला विचारले. कोणी म्हणाले 'पावती', कोणी म्हणाले 'किमतीचे लेबल'. शेवटी सर्वजन उत्तरापर्यंत पोहोचले की 'यूजर्स मॅन्युअल'. त्याशिवाय चांगले यंत्रही दामटून वापरले तर पुरते बिघडू शकते. माणूस हे कदाचित पृथ्वीवरील सर्वात कार्यक्षम यंत्र आहे. त्याची किंमत तर करताच येणार नाही. आपल्या जन्माबरोबर युजर्स मॅन्युअल मात्र येत नाही. त्यामुळे माणसाने आपले जीवन कसे घडवायचे हे लवकरात लवकर समजावण्याची जबाबदारी समाजाची, घराची आणि त्याहीपेक्षा शाळेची आहे. जीवनासाठी मॅन्युअल असे हवे की त्यातून मला माझी बलस्थाने आणि कमकुवत स्थाने समजून आपल्या क्षमतांचा पिसारा कसा फुलवायचा हे समजले पाहिजे. त्याचबरोबर मी ज्या कुटुंबात, समाजात राहतो, त्यातील लोकांशी सुसंवाद साधून एकमेकांची प्रगती कशी साधायची हे ही समजले पाहिजे. हे सगळे एका मॅन्युअलमध्ये आहे; ते म्हणजे भारताचे संविधान. नीट विचार केला तर त्यातील स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय हे सर्वांची प्रगती साधणाऱ्या सहजीवनासाठीचे पासवर्डस् आहेत. घरी–दारी घडणाऱ्या विसंवादाच्या प्रसंगांचा मागोवा घेतला तर त्यामागे कोणत्यातरी मूल्याकडे आपले कळत–नकळत दुर्लक्ष झालेले दिसून संविधानातील मूल्ये शाळेतील मुलांच्या वागण्यात प्रतिबिंबित होण्यासाठी मूल्यवर्धन कार्यक्रमाने व्यवहार्य मार्ग दाखविला आहे.

एक शिक्षण खात्यातील अधिकारी म्हणून मागे वळून पाहताना असे दिसते की संविधानातील ही मूल्ये, दहा गाभाभूत तत्त्वे, जीवनकौशल्ये आणि वृत्तींमध्ये बदल अपेक्षित असणाऱ्या इतर अनेक गोष्टी रुजविण्याच्या संधी सर्व विषयांच्या रोजच्या अध्ययन–अध्यापनातून शक्य तेथे द्याव्यात असे अभ्यासक्रमात पूर्वीपासून अपेक्षितच होते, पण हे अपवादानेच घडताना दिसले. या पार्श्वभूमीवर निवडक प्रचलित शैक्षणिक तत्त्वांचा समन्वय साधून मूल्य रुजविण्यासाठीचे तंत्र आणि मंत्र मूल्यवर्धन कार्यक्रमाने दाखविले आहे असे मला वाटते. आपल्या मनाच्या डोहात डोकावण्याचे अवघड वाटणारे काम लहान मुलेही कसे करू शकतात ही महत्त्वाची गोष्ट मी कोण, माझ्या आवडी निवडी इ. प्रारंभिक मूल्यवर्धन उपक्रमातून उलगडते. आधी स्वतःला समजून घेतले तरच इतरांचे मन समजून इतरांशी संवाद साधण्याची पूर्वपीठिका तयार होते, हे महत्त्वाचे तत्त्व मूल्यवर्धन उपक्रमात आहे. योग्य संधी दिली तर मुले मोठ्यांनाही सुचू शकणार नाही असा छान विचार आणि कल्पना करू शकतात, चर्चा करून निर्णय घेऊ शकतात, जबाबदारीने वागू शकतात यावर मूल्यवर्धन कार्यक्रमाचा विश्वास आहे.

काही दिवसांपूर्वीची गोष्ट, एका शाळेत गेलो होतो. शाळेचे रंगरूप साधारणच होते. एकाच वर्गात चार–पाच वेगवेगळ्या मातृभाषा असणारी मुले होती. त्यांच्या घरातल्या समस्यांच्या खुणा न सांगताच चेहरा, पोशाख, देहबोली यांवरून दिसून येत होत्या. प्रथमदर्शनी निरस दिसणारे वातावरण मूल्यवर्धन उपक्रम सुरू झाल्यावर बदलले. बाईंनी सांगण्याचा अवकाश की मुले पटकन एकमेकांना खेटून छोट्या–छोट्या गटात बसली. डोक्याला डोकी लावून, खाणाखुणा करून कुजबुजू लागली. एकमेकांना सुचवू लागली. सगळे मिळून जे ठरेल ते कोणीतरी वहीवर लिहीत होते. लांबून त्यांचे बोलणे समजत नसले तरी त्यांच्या डोळ्यातली चमक आणि हावभाव यांतून त्यांच्या मनातल्या कल्पनांची फुलपाखरे कशी उडताहेत याचा अंदाज येत होता. त्यांच्या वेगळ्या भाषांची अडचण संवादात आड येत नव्हती. त्यानंतर एकेका गटाने वर्गापुढे येऊन वाचले. लिहिलेलेही गमतीशीर, कल्पकतेची झलक दाखविणारे होते. बहुतेकांची वाघ मागे लागल्यासारखी एका श्वासात वाचण्याची आणि वाचल्यावर पळत आपली जागा गाठण्याची लगबग बालपणाची आठवण करून देणारी होती. हे घडत असताना एकीकडे बाई मुलांच्या गटात डोकावून मदत करत होत्या आणि दुसरीकडे मुलांच्या या सहभागाबद्दल बाईंची 'विना थांबा' कॉमेंट्रीपण सुरू होती. शेवटी बाईंनी सर्वांचे कौतुक केले. वर्ग आनंदाने आणि उत्साहाने उजळून निघाला होता. जणु संविधानाचं आणि शिक्षणाचं मर्म दाखविणारा ट्रेलरच समोर घडत होता. वाटलं यापेक्षा आणखी वेगळं काय पाहिजे?

मूल्यवर्धन उपक्रम घेत असलेल्या वर्गांचे हे कमी अधिक प्रमाणात नक्कीच सुखद वाटणारे चित्र आहे. अर्थात हे चित्र प्रातिनिधिक होण्यासाठी तसेच उपक्रमातील भावनिक अंगांशी संबंधित चर्चा अधिक अर्थपूर्ण आणि परिणामकारक होण्यासाठी प्रयत्न सुरूच ठेवावे लागणार आहेत. एखाद्या वर्षातच सगळे साध्य होणार नाही ही जाणीव शिक्षक बंधूभगिनींना आणि प्रशासनालाही आहे.

शाळाभेटीत मूल्यवर्धन कार्यक्रम ही वर्गातले आणि शाळेतले वातावरण बदलणारी आनंदयात्रा आहे हे शिक्षकांना मनापासून वाटत आहे, याचा प्रत्यय त्यांच्याशी बोलताना पदोपदी येतो. मुलांमध्ये होणाऱ्या बदलांबरोबर अनेकदा शिक्षक स्वतःमध्येही बदल झाल्याचे मोकळेपणाने सांगतात. त्यांनाच काय तर मलाही स्वतःत बदल झाल्याच जाणवतं हे सांगताना मला संकोच वाटत नाही. हे सर्व अनुभव म्हणजे ही आनंदयात्रा आपण ठरविलेल्या दिशेने वाटचाल करीत राहणार असल्याचे आश्वासक संकेतच आहेत. या स्पर्धेच्या युगात मूल्यांविषयी कमी होत चाललेले गांभीर्य मूल्यवर्धन कार्यक्रमामुळे काही प्रमाणात पुन्हा निर्माण होत आहे हे मूल्यवर्धन कार्यक्रमाचे मोठेच यश म्हणावे लागेल.

**श्री. विद्याधर शुक्ल**
**निवृत्त उपसंचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे**



:
शांतिलाल मुथ्था फाउंडेशन, ८ वा मजला, मुथ्था चेंबर्स –२, सेनापती बापट मार्ग, पुणे–४११०१६.
फोन नं.: ०२० ६६०५०००० | info@mutthafoundation.org | www.mutthafoundation.org